पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड
स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाजवळ, प्रेमलोक पार्क,
पिंपरी चिंचवड ४११०३३
दुरध्वनी क्रमांक- ०२०-२७३५०५५५

जा.क्र.आस्था-२/पो.अंमलदार/सेवाज्येष्ठता/ /२०२३,२०९०८७ पिंपरी चिंचवड, दिनांक २५/०५/२०२३

**विषय :-पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड घटकाचे आस्थापनेवरील कार्यरत पोलीस अंमलदार यांची . सेवाजेष्ठता प्रसिध्दीबाबत...**

----- ००० ------

आ दे श :-

पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड घटकाचे आस्थापनेवरील कार्यरत पोलीस शिपाई ते सहा. पोलीस फौजदार यांची तात्पुरत्या स्वरुपातील सेवाजेष्ठता यादी (www.pcpc.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

ज्येष्ठता सुचीमधील नमुद करण्यात आलेली जन्म तारीख, भरती तारीख, सेवानिवृत्तीची तारीख, जात, जातीचा प्रवर्ग, रा,रा,पो,बल गट व इतर घटकामधून आंतरजिल्हा बदलीवर या घटकात हजर झालेली तारीख, इ. बाबतची माहिती संबंधित पोलीस अंमलदार यांच्या सेवापटावरुन तपासुन ती बरोबर आहे अगर कसे याबाबतची खात्री करावी.

१. सेवापटातील नोंदीनुसार सेवाज्येष्ठतेबाबत काही आक्षेप, दुरुस्ती असल्यास त्याबाबत दुरुस्तीची पडताळणी करुन त्याबाबतचा दुरुस्ती अहवाल खालील विहित नमुन्यात इकडील कार्यालयास सादर करणेत यावा.

| अ.क्र | पोलीस अंमलदार यांचा हुदा, ब.न. व संपुर्ण नाव | प्रसिध्द करणेत आलेल्या सेवाज्येष्ठता सुची मधील नोंद | सेवापटातील नोंदीनुसार करावयाची दुरुस्ती | दुरुस्ती/आक्षेप योग्य कि अयोग्य याबाबतचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

२. सेवाज्येष्ठता सुचीमध्ये ज्या पोलीस अंमलदार यांचे नाव समाविष्ठ नसेल अश्या पोलीस अंमलदार यांची माहिती पद निहाय प्रसिध्द करणेत आलेल्या सेवाज्येष्ठतेच्या रकानामध्ये इकडील कार्यालयास सादर करणेत यावी.

३. प्रसिध्द करणेत आलेल्या सेवाज्येष्ठता सुचीमधील ज्या अंमलदारांच्या नावासमोरील रकान्यामधील माहिती भरण्यात आलेली नाही. त्याबाबतची माहिती सेवापटावरुन पडताळणी करुन भरणेत यावी व त्यांची स्वतंत्र नामावली इकडील कार्यालयास सादर करावी.

४. प्रसिध्द करणेत आलेल्या सेवाज्येष्ठता सूचीमध्ये मयत, सेवानिवृत्त,राजीनामा,बडतर्फ,मिसींग, पोलीस अंमलदार यांच्या नावाचा समावेश असलेस त्याबाबत इकडील कार्यालयास अवगत कराव.

५. प्रसिध्द करणेत आलेली सेवाज्येष्ठता सुची ही तात्पूरती/प्रारुप असून केवळ दुरुस्ती करण्याचे अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित पोलीस अंमलदारांनी दुरुस्ती/आक्षेपाबाबतचे अर्ज एकत्र संबंधित डिओ यांचेकडे जमा करावे.

६. संबंधित डिओ यांनी सेवाज्येष्ठता सुचीतील दुरुस्ती/आक्षेपाबाबतचे एकत्र अर्ज संबधित आस्थापना/परिमंडळ लिपीक यांच्याकडे सादर करावे. तसेच संबधित आस्थापना/परिमंडळ लिपीक यांनी दुरुस्ती अ.क्र.१ नुसार दुरुस्ती करुन दोन दिवसात एकत्रितरित्या समक्ष आस्थापना शाखा-२ यांचेकडे सादर करण्यात यावेत.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड

प्रति,

१. प्रभारी अधिकारी संगणक शाखा,पिंपरी चिंचवड प्रसिध्दीकरीता
२. सर्व संबंधित पोलीस अंमलदार (पोलीस नोटीसीअन्वये)

प्रत :- संबंधित डिआ/आस्थापना लिपीक, पिंपरी चिंचवड./पोलीस नोटीस प्रसिध्दीकरीता./